RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ३, अंक २३] सोमवार, एप्रिल ३, २०१७/चैत्र १३, शके १९३९ [पृष्ठे १८, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ३८**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| **सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५.**—ॲक्यूपंक्चर चिकित्सा पद्धतीचे अध्यापन व व्यवसाय यांचे विनियमन करून तिचा विकास करण्यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित किंवा तद्नुषंगिक इतर विवक्षित बाबींच्या संबंधात तरतूद करण्याकरिता अधिनियम. | पृष्ठे १-१८ |

दिनांक १५ मार्च २०१७ रोजी मा. राष्ट्रपतींनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**प्रकाश हिं. माळी,**
प्रधान सचिव (विधि विधान),
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

**सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५.**

(मा. राष्ट्रपतींची संमती मिळाल्यानंतर " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** " दिनांक ३ एप्रिल २०१७ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**ॲक्यूपंक्चर चिकित्सा पद्धतीचे अध्यापन व व्यवसाय यांचे विनियमन करून तिचा विकास करण्यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित किंवा तद्नुषंगिक इतर विवक्षित बाबींच्या संबंधात तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** ॲक्यूपंक्चर चिकित्सा पद्धतीचे अध्यापन व व्यवसाय यांचे विनियमन करून तिचा विकास करण्यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींकरिता तरतूद करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सहासष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

## प्रकरण एक

## प्रारंभिक

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र ॲक्यूपंक्चर चिकित्सा पद्धती अधिनियम, २०१५ असे म्हणावे.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नेमून देईल अशा दिनांकास अंमलात येईल.

व्याख्या.

२. या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,–

(क) "ॲक्यूपंक्चर" याचा अर्थ, जागतिक आरोग्य संघटनेने शिफारस केलेली ॲक्यूपंक्चर पद्धती, असा आहे आणि त्यामध्ये, चूषण (बांबू किंवा काच किंवा प्लॅस्टिक किंवा रबर यापासून बनविलेल्या तत्सम चषकाकार वस्तूच्या सहाय्याने काही विशिष्ट सुईवेधन बिंदुवर किंवा भागावर निर्वात क्रिया घडवून आणणारी सहाय्यभूत पद्धती), दाब (जेथे सुईवेधन शक्य नाही तेथे सुईवेधन बिंदुवर कोणत्याही बोटाने किंवा बोथट गोलाकार वस्तूने दाब देण्याची क्रिया करणे), सप्ततारांकित सुई (सुईवेधन बिंदुवर किंवा विशिष्ट भागावर किंवा रेषेवर टोचण्यासाठी एका टोकास बसविलेली सात किंवा पाच क्रमांकाची वेधनसुई), विद्युत सुईवेधन उद्दीपन (सुईवेधन बिंदुवर कमी तीव्रतेचे विद्युत उद्दीपन करणे), लेझर सुईवेधन (सुईवेधन बिंदुवर कमी तीव्रतेची लेझर क्रिया करणे), अंत्ररज्जु रोपणे (सुईवेधन बिंदुवर शल्यीअंत्ररज्जु रोपणे), आणि महाराष्ट्र ॲक्यूपंक्चर परिषदेच्या शिफारशीनुसार राज्य शासनाकडून अधिसूचित करण्यात येतील अशा अन्य पद्धती, यांचा समावेश होतो ;

(ख) "ॲक्यूपंक्चर संस्था" याचा अर्थ, ॲक्यूपंक्चर अभ्यास व प्रशिक्षण पाठ्यक्रम आयोजित करणारी किंवा प्रस्तुत करणारी संस्था, असा आहे ;

(ग) "संलग्न ॲक्यूपंक्चर संस्था" याचा अर्थ, परिषदेशी संलग्न असलेली ॲक्यूपंक्चर संस्था, असा आहे ;

(घ) "ॲक्यूपंक्चर व्यवसायी" याचा अर्थ, ॲक्यूपंक्चर चिकित्सा पद्धतीचा व्यवसाय करणारी व्यक्ती, असा आहे ;

(ङ) "ॲक्यूपंक्चर कर्मचारी" याचा अर्थ, ॲक्यूपंक्चर चिकित्सा पद्धतीचा व्यवसाय करणाऱ्या नोंदणीकृत ॲक्यूपंक्चर व्यवसायीला सहाय्य करणाऱ्या व्यक्ती, असा आहे ;

(च) "प्रवेश क्षमता" याचा अर्थ, ॲक्यूपंक्चर संस्थेकडून चालविण्यात येणाऱ्या ॲक्यूपंक्चर अभ्यास किंवा प्रशिक्षण पाठ्यक्रमाला प्रवेश देण्यासाठी परिषदेकडून वेळोवेळी, निश्चित करण्यात येईल अशी विद्यार्थ्यांची कमाल संख्या, असा आहे ;

(छ) "प्रमाणपत्र" याचा अर्थ, जागतिक आरोग्य संघटनेच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार, परिषदेकडून विहित करण्यात येईल असा अभ्यासक्रम व प्रशिक्षण आणि त्यासाठी विहित करण्यात येईल अशा कालावधीच्या समाप्तीनंतर त्याकरिता परिषदेकडून देण्यात येणारे प्रमाणपत्र, असा आहे ;

(ज) "परिषद" याचा अर्थ, कलम ३ अन्वये घटित केलेली महाराष्ट्र ॲक्यूपंक्चर परिषद, असा आहे ;

(झ) "पदविका" याचा अर्थ, जागतिक आरोग्य संघटनेच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार, परिषदेकडून विहित करण्यात येईल असा अभ्यास व प्रशिक्षण पाठ्यक्रम आणि अशा कालावधीच्या समाप्तीनंतर परिषदेकडून देण्यात येणारी पदविका, असा आहे ;

(ञ) "पदवी" याचा अर्थ, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ याच्या तरतुदींनुसार विहित करण्यात येईल अशा जागतिक आरोग्य संघटनेच्या त्याबाबतीत प्रसिद्ध केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांशी विसंगत नसलेला असा ॲक्यूपंक्चर अभ्यास व प्रशिक्षण पाठ्यक्रम आणि त्याच्याशी विसंगत नसलेल्या अशा कालावधीच्या समाप्तीनंतर महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाकडून देण्यात येणारी पदवी, असा आहे ;

१९९९ चा महा. १०.

(ट) " पात्रता चाचणी " याचा अर्थ, पदविका प्रदान करण्यासाठी परिषदेकडून घेण्यात येणाऱ्या परीक्षेचे स्वरूप व दर्जा असणारी, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतनंतर परिषद निर्धारित करील अशा दिनांकास, या अधिनियमाखालील नोंदणीच्या प्रयोजनार्थ, परिषदेकडून फक्त एकदाच घेतली जाणारी किंवा घेण्याची व्यवस्था केलेली ॲक्यूपंक्चर अभ्यासक्रमाची परीक्षा, असा आहे ;

(ठ) " शासन " किंवा " राज्य शासन " याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(ड) " सदस्य " याचा अर्थ, परिषदेचा सदस्य, असा आहे ;

(ढ) " विहित " याचा अर्थ, नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे ;

(ण) " अध्यक्ष " याचा अर्थ, परिषदेचा अध्यक्ष, असा आहे ;

(त) " मान्यताप्राप्त ॲक्यूपंक्चर अर्हता " याचा अर्थ, परिषदेने मान्यता दिलेल्या ॲक्यूपंक्चर चिकित्सा पद्धतीमधील अर्हता, असा आहे ;

(थ) " मान्यताप्राप्त संशोधन संस्था " याचा अर्थ, ॲक्यूपंक्चरमधील किंवा ॲक्यूपंक्चरशी संबंधित संशोधन करणारी आणि परिषदेने मान्यता दिलेली संस्था, असा आहे ;

(द) " नोंदवही " याचा अर्थ, या अधिनियमाअन्वये ठेवलेली ॲक्यूपंक्चर व्यवसायींची नोंदवही आणि ॲक्यूपंक्चर कर्मचाऱ्यांची नोंदवही, असा आहे ;

(ध) " नोंदणीकृत ॲक्यूपंक्चर व्यवसायी " याचा अर्थ, या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये नोंदणी केलेली ॲक्यूपंक्चर व्यवसायी, असा आहे ;

(न) " नोंदणीकृत ॲक्यूपंक्चर कर्मचारी " याचा अर्थ, या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये नोंदणी केलेले ॲक्यूपंक्चर कर्मचारी, असा आहे ;

(प) " प्रबंधक " याचा अर्थ, कलम १३ अन्वये नियुक्त केलेला परिषदेचा प्रबंधक, असा आहे ;

(फ) " विनियम " याचा अर्थ, या अधिनियमाअन्वये परिषदेने केलेले विनियम, असा आहे ;

(ब) " नियम " याचा अर्थ, राज्य शासनाने या अधिनियमाखाली केलेले नियम, असा आहे ;

(भ) " कलम " याचा अर्थ, या अधिनियमाचे कलम, असा आहे ;

(म) " अध्यापक " याचा अर्थ, अध्यापनातील पद धारण करण्याकरिता, परिषदेशी संलग्न असलेल्या किंवा परिषदेने मान्यता दिलेल्या ॲक्यूपंक्चर संस्थेने नियुक्त केलेली कोणतीही व्यक्ती, असा आहे ;

(य) " उपाध्यक्ष " याचा अर्थ, परिषदेचा उपाध्यक्ष, असा आहे.

प्रकरण दोन

## परिषदेची रचना व तिचे विधिसंस्थापन

**३.** (१) राज्य शासनास, या अधिनियमाच्या प्रारंभानंतर, शक्य तितक्या लवकर, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र ॲक्यूपंक्चर परिषद या नावाने संबोधली जाणारी एक परिषद घटित करता येईल. परिषदेची रचना व तिचे विधिसंस्थापन.

(२) ती परिषद एक अखंड परंपरा व सामान्य मुद्रा असलेला एक निगम निकाय असेल आणि तिला जंगम व स्थावर मालमत्ता संपादन करण्याचा, ती धारण करण्याचा, हस्तांतरित करण्याचा किंवा तिचा विनियोग करण्याचा आणि संविदा करण्याचा अधिकार असेल आणि उपरोक्त नावाने तिला किंवा तिच्यावर दावा लावता येईल.

(३) परिषद पुढील सदस्यांची मिळून बनलेली असेल :—

(क) नोंदणीकृत ॲक्यूपंक्चर व्यवसायींनी आपल्यामधून, विहित करण्यात येईल अशा मतदारसंघातून आणि अशा रीतीने निवडून दिलेले पाच सदस्य, जे भारताचे नागरिक असतील ;

(ख) नोंदणीकृत ॲक्यूपंक्चर व्यवसायींमधून राज्य शासनाने नामनिर्देशित केलेले दोन सदस्य, जे दोघेही भारताचे नागरिक असतील ;

(ग) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने नामनिर्देशित केलेला एक सदस्य ;

(घ) संलग्न ॲक्यूपंक्चर संस्थांच्या, कोणत्याही नावाने संबोधल्या जाणाऱ्या, प्रमुखांमधून राज्य शासनाने नामनिर्देशित केलेला एक सदस्य ;

(ङ) मान्यताप्राप्त संशोधन संस्थांच्या, कोणत्याही नावाने संबोधल्या जाणाऱ्या, प्रमुखांमधून राज्य शासनाने नामनिर्देशित केलेला एक सदस्य.

(४) पोट-कलम (३) च्या खंड (क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या सदस्यांची निवडणूक ही, विहित करण्यात येईल अशा वेळी व अशा ठिकाणी आणि अशा रीतीने घेतली जाईल.

(५) जर पोट-कलम (३) च्या खंड (ग) नुसार विहित दिनांकापर्यंत सदस्याचे नामनिर्देशन केले नाही तर, ते रिक्त पद भरण्याकरिता नोंदणीकृत ॲक्यूपंक्चर व्यवसायीचे नामनिर्देशन करणे राज्य शासनासाठी कायदेशीर असेल.

(६) जर पोट-कलम (३) च्या खंड (क) अन्वये कोणत्याही निवडणुकीमध्ये मतदारांनी आवश्यक त्या संख्येत सदस्य निवडून दिले नाहीत तर, ते रिक्त पद किंवा पदे भरण्याकरिता राज्य शासनास, त्यास योग्य वाटेल अशा नोंदणीकृत ॲक्यूपंक्चर व्यवसायीला किंवा नोंदणीकृत ॲक्यूपंक्चर व्यवसायींना नामनिर्देशित करणे कायदेशीर असेल आणि अशा रीतीने नामनिर्देशित केलेले व्यवसायी हे, या कलमाअन्वये यथोचितरीत्या निवडून आले असल्याचे मानण्यात येईल.

(७) या अधिनियमातील पूर्वगामी पोट-कलमांमध्ये किंवा इतरत्र काहीही अंतर्भूत असले तरी, पहिल्यांदाच घटित होणाऱ्या परिषदेवर, पोट-कलम (३) च्या खंड (क) मध्ये निर्दिष्ट केलेले सर्व सदस्य हे, राज्य शासनाकडून नामनिर्देशित करण्यात येतील.

(८) परिषदेच्या पुनर्रचनेनंतर, गणपूर्ती झालेल्या तिच्या पहिल्या बैठकीमध्ये परिषदेचे सदस्य आपल्यामधून अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची निवड करतील :

परंतु, पहिल्या परिषदेच्या अध्यक्षाचे व उपाध्यक्षाचे नामनिर्देशन राज्य शासनाकडून करण्यात येईल :

परंतु आणखी असे की, या अधिनियमाच्या इतर तरतुदींना अधीन राहून, जी व्यक्ती अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष म्हणून पद धारण करते किंवा जिने ते पद धारण केले आहे ती व्यक्ती, त्या पदावर पुन्हा निवडली जाण्यास पात्र असेल.

(९) एखाद्या सदस्याच्या किंवा अध्यक्षाच्या किंवा उपाध्यक्षाच्या कोणत्याही निवडणुकीसंबंधात एखादा विवाद उद्भवल्यास, तो विवाद राज्य शासनाकडे निर्णयार्थ निर्देशित करण्यात येईल आणि राज्य शासनाचा त्यावरील निर्णय अंतिम असेल.

पदावधी. ४. (१) शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, निवडून आलेल्या व नामनिर्देशित करण्यात आलेल्या दोन्ही सदस्यांची नावे प्रसिद्ध करील.

(२) या अधिनियमात अन्यथा तरतूद केली असेल ती खेरीज करून, कोणताही सदस्य,– मग तो निवडून आलेला असो किंवा नामनिर्देशित करण्यात आलेला असो,—पोट-कलम (१) अन्वये अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आल्याच्या दिनांकापासून पाच वर्षांच्या अवधीकरिता पद धारण करील.

(३) या अधिनियमाद्वारे अन्यथा तरतूद केली असेल ती खेरीज करून, अध्यक्ष व उपाध्यक्ष हे, त्यांची निवड झाल्याच्या दिनांकापासून, त्यांचा सदस्य म्हणून असलेला पदावधी संपण्याच्या दिनांकापर्यंत, पद धारण करतील.

(४) पोट-कलम (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, मावळत्या सदस्याचा पदावधी, पोट-कलम (१) अन्वये उत्तराधिकारी सदस्यांची नावे ज्या दिवशी प्रसिद्ध करण्यात येतील त्या दिवसाच्या लगतपूर्वीच्या दिवसापर्यंत वाढविण्यात आला असल्याचे आणि तो पदावधी त्या दिवशी संपत असल्याचे समजण्यात येईल.

(५) पोट-कलम (३) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, मावळत्या अध्यक्षाचा किंवा उपाध्यक्षाचा पदावधी यथास्थिति, अशा अध्यक्षाचा किंवा उपाध्यक्षाचा उत्तराधिकारी ज्या दिवशी निवडण्यात येईल त्या दिवसाच्या लगतपूर्वीच्या दिवसापर्यंत वाढविण्यात आला असल्याचे आणि तो पदावधी त्या दिवशी संपत असल्याचे समजण्यात येईल.

(६) मावळता सदस्य पुन्हा निवडून येण्यास किंवा पुन्हा नामनिर्देशित केला जाण्यास पात्र असेल.

(७) कोणत्याही सदस्यास परिषदेकडून सहा महिन्यांहून अधिक नसेल इतक्या कालावधीपर्यंत अनुपस्थिती रजा मंजूर केली जाऊ शकेल.

**५.** (१) अध्यक्ष, किंवा उपाध्यक्ष यांचा किंवा कलम ३ च्या पोट-कलम (३) च्या खंड (क) अन्वये निवडून दिलेल्या सदस्याचा पदावधी संपण्यापूर्वी, मृत्यू, राजीनामा, निरर्हता किंवा निःसमर्थता यांमुळे अथवा अन्य कोणत्याही कारणामुळे त्याचे नैमित्तिकरीत्या रिक्त होणारे कोणतेही पद, निवडणुकीद्वारे भरण्यात येईल : नैमित्तिक रिक्त पदे.

परंतु, ज्या दिनांकास सर्व सदस्यांचा पदावधी संपत असेल त्या दिनांकापूर्वीच्या सहा महिन्यांमध्ये निवडून आलेल्या सदस्यांचे रिक्त होणारे असे कोणतेही पद भरण्यात येणार नाही.

(२) कलम ३ च्या पोट-कलम (३) च्या खंड (ख), (ग), (घ) आणि (ङ) अन्वये नामनिर्देशित करण्यात आलेल्या सदस्याचा पदावधी संपण्यापूर्वी असे पद नैमित्तिकरीत्या रिक्त झाले तर, प्रबंधक, उक्त बाब तात्काळ राज्य शासनाला किंवा, यथास्थिति, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाला कळवील आणि त्यानंतर शक्य तितक्या लवकर राज्य शासन किंवा, यथास्थिति, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नामनिर्देशनाद्वारे ते पद भरील.

(३) कोणतेही नैमित्तिक रिक्त पद भरण्यासाठी पोट-कलम (१) अन्वये निवडण्यात आलेली किंवा पोट-कलम (२) अन्वये नामनिर्देशित करण्यात आलेली कोणतीही व्यक्ती, कलम ४ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, ज्या सदस्याच्या जागी तिला निवडून देण्यात आले असेल किंवा नामनिर्देशित करण्यात आले असेल, त्या सदस्याने, ते पद रिक्त झाले नसते तर ते जितक्या अवधीपर्यंत धारण केले असते फक्त तितक्याच अवधीपर्यंत ते पद धारण करील.

**६.** (१) जर, अध्यक्षाचा मृत्यू झाल्यास किंवा त्याने पदाचा राजीनामा दिल्यास किंवा पद धारण करण्याचे बंद केल्यास, परिषद, सदस्यांमधून दुसऱ्या एखाद्या व्यक्तीची अध्यक्ष म्हणून निवड करील आणि असा अध्यक्ष हा, आधीच्या अध्यक्षाच्या उर्वरित कालावधीसाठी ते अध्यक्षपद धारण करील. अध्यक्षाचे नैमित्तिक रिक्त पद.

(२) पोट-कलम (१) अन्वये अध्यक्षाचे कोणतेही पद रिक्त झाल्यास, पोट-कलम (१) च्या तरतुदींस अधीन राहून उपाध्यक्ष हा, नवीन अध्यक्षाची निवड होईतोपर्यंत अध्यक्षाची कार्ये पार पाडील.

(३) जेव्हा अध्यक्ष हा, अनुपस्थिती, आजारपण यांमुळे किंवा इतर कोणत्याही कारणामुळे आपल्या पदाची कर्तव्ये पार पाडण्यास असमर्थ असेल तेव्हा, उपाध्यक्ष हा, अध्यक्ष आपल्या कर्तव्यावर ज्या दिनांकास रुजू होईल त्या दिनांकापर्यंत अध्यक्षाची कार्ये पार पाडील.

**७.** (१) अध्यक्षास किंवा उपाध्यक्षास, परिषदेस उद्देशून दिलेल्या लेखी नोटिशीद्वारे व ती नोटीस निबंधकाच्या स्वाधीन करून, कोणत्याही वेळी आपल्या पदाचा राजीनामा देता येईल. असा राजीनामा, परिषदेने ज्या दिनांकास स्वीकारला असेल त्या दिनांकापासून तो अंमलात येईल. राजीनामा.

(२) निवडून आलेल्या सदस्यास, कोणत्याही वेळी, अध्यक्षाला उद्देशून लेखी नोटीस देऊन आपल्या पदाचा राजीनामा देता येईल. नामनिर्देशित सदस्यास कोणत्याही वेळी शासनाला किंवा, यथास्थिति, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाला उद्देशून लेखी नोटीस देऊन आपल्या पदाचा राजीनामा देता येईल. असा प्रत्येक राजीनामा, शासनाने किंवा यथास्थिति, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने ज्या दिनांकास स्वीकारला असेल त्या दिनांकापासून तो अंमलात येईल.

**८.** (१) जर एखादी व्यक्ती,– निरर्हता.

(क) विकल मनाची असेल किंवा ती विकल मनाची बनली असेल आणि सक्षम न्यायालयाने तिला तसे घोषित केलेले असेल ; किंवा

(ख) शासनाच्या मते परिषदेची सदस्य होण्यास ती अपात्र ठरेल अशा, नैतिक अधःपतनाचा अंतर्भाव असलेल्या कोणत्याही अपराधाबद्दल ती सिद्धापराधी ठरली असेल किंवा तिला सिद्धापराधी ठरवलेले असेल ; किंवा

(ग) ती अविमुक्त दिवाळखोर असेल किंवा तिला कोणत्याही वेळी अविमुक्त दिवाळखोर म्हणून अभिनिर्णीत करण्यात आले असेल ; किंवा

(घ) तिचे नाव नोंदवहीतून काढून टाकण्यात आले असेल आणि त्या नोंदवहीमध्ये पुन्हा तिची नोंदणी करण्यात आली नसेल ; किंवा

(ङ) ती परिषदेची कर्मचारी असेल ; किंवा

(च) तिने प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे परिषदेबरोबर, परिषदेने किंवा परिषदेच्या वतीने केलेल्या कोणत्याही संविदेमध्ये कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध धारण केलेला असेल ; किंवा

(छ) तिला नैतिक अध:पतनाचा अंतर्भाव असलेल्या अक्षम्य गैरवर्तणुकीवरून किंवा अपराधाच्या दोषारोपावरून केंद्र सरकारच्या किंवा राज्य शासनाच्या किंवा पंचायतीच्या किंवा नगरपालिकेच्या सेवेतून बडतर्फ करण्यात आले असेल ; किंवा

(ज) त्या व्यक्तीचे वय २१ वर्षाखालील असेल,

तर, अशी कोणतीही व्यक्ती सदस्य म्हणून निवडून येण्यास किंवा नामनिर्देशित केली जाण्यास आणि सदस्य म्हणून असण्याचे चालू राहण्यास निरर्ह ठरेल.

**स्पष्टीकरण.—** खंड (छ) च्या प्रयोजनांसाठी, " पंचायत " व " नगरपालिका " या शब्दप्रयोगांना, भारताच्या संविधानामध्ये अनुक्रमे अनुच्छेद २४३ च्या खंड (घ) व अनुच्छेद २४३-त च्या खंड (ङ) मध्ये त्यांना जे अर्थ नेमून दिलेले असतील तेच अर्थ असतील.

(२) जर कोणताही सदस्य परिषदेच्या परवानगीशिवाय, किंवा परिषदेच्या मते जी पुरेशी असतील अशा कारणांशिवाय लागोपाठ तीन बैठकींना गैरहजर राहिला असेल तर, परिषदेस त्याची जागा रिक्त झाल्याचे जाहीर करता येईल आणि उक्त रिक्त जागा भरण्याकरिता उपाययोजना करता येईल.

(३) जर कोणताही सदस्य पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या निरर्हतांपैकी कोणत्याही प्रकारे निरर्ह झाला असेल किंवा कोणत्याही निरर्हतेस पात्र ठरल्याचे आढळून आले असेल तर, परिषद, शासनाला एक अहवाल सादर करील आणि त्याच्या निरर्हतेविषयी शासनाची खात्री झाली तर शासन त्या सदस्याची जागा रिक्त झाल्याचे जाहीर करील.

परिषदेच्या बैठका.

**९.** (१) परिषदेच्या बैठका ह्या, विहीत करण्यात येईल अशा रीतीने बोलावण्यात, घेण्यात व आयोजित करण्यात येतील.

(२) पाच सदस्यांच्या उपस्थितीची गणपूर्ती झाल्याशिवाय परिषदेच्या कोणत्याही बैठकीमध्ये कोणतेही कामकाज चालविण्यात येणार नाही.

(३) अध्यक्ष, उपस्थित असेल तेव्हा परिषदेच्या प्रत्येक बैठकीचे अध्यक्षस्थान भूषवील. जर कोणत्याही बैठकीत अध्यक्ष अनुपस्थित असेल तर उपाध्यक्ष, आणि अध्यक्ष व उपाध्यक्ष या दोन्हींच्या अनुपस्थितीत अशा बैठकींत उपस्थित असलेल्या सदस्यांनी आपल्यामधून निवडून दिलेला एखादा अन्य सदस्य, अशा बैठकीचे अध्यक्षस्थान भूषवील.

(४) परिषदेच्या बैठकीत मांडल्या जाणाऱ्या सर्व प्रश्नांचा निर्णय बहुमताने करण्यात येईल.

(५) समसमान मते पडल्यास, पीठासीन प्राधिकारी, दुसरे किंवा निर्णायक मत देण्याच्या अधिकाराचा वापर करील.

**बैठकींमधील कामकाज आणि कार्यवाहींची विधिग्राह्यता.**

**१०.** (१) परिषदेच्या प्रत्येक बैठकीतील चर्चेचे कामकाज गोपनीय समजण्यात येईल ; आणि कोणतीही व्यक्ती, परिषदेच्या पूर्व ठरावाशिवाय अशा कामकाजाचा कोणताही भाग उघड करणार नाही :

परंतु, या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे, परिषदेने अशा ठरावासदेखील गोपनीय समजण्याचा निदेश दिलेला नसेल तर, परिषदेने स्वीकृत केलेल्या अशा कोणत्याही ठरावातील मजकूर, उघड करण्यास किंवा प्रसिद्ध करण्यास कोणत्याही व्यक्तीला प्रतिबंध होणार नाही.

(२) परिषदेची कोणतीही कृती किंवा कार्यवाही ही,—

(क) परिषदेतील कोणतीही रिकामी जागा किंवा रचनेत कोणताही दोष आहे ; किंवा

(ख) परिषदेच्या सदस्याच्या निवडणूकीतील किंवा नामनिर्देशनातील कोणताही दोष आहे ; किंवा

(ग) प्रकरणाच्या गुणावगुणांवर परिणाम न करणारी अशी, परिषदेच्या कार्यपद्धतीत कोणतीही अनियमितता आहे,

केवळ एवढ्याच कारणावरून अवैध ठरणार नाही :

परंतु, परिषदेच्या कार्यपद्धतीतील अशा अनियमिततेमुळे प्रकरणाच्या गुणावगुणांवर परिणाम होतो किंवा नाही याबाबतच्या प्रश्नावरील निर्णय अध्यक्षाकडून करण्यात येईल आणि त्यावरील त्याचा निर्णय अंतिम व बंधनकारक असेल.

कार्यकारी समिति आणि इतर समित्या.

**११.** (१) परिषद शक्य तितक्या लवकर, परिषदेने सोपविलेली कार्ये व कर्तव्ये पार पाडण्यासाठी आणि प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करण्यासाठी आपल्या सदस्यांमधून एक कार्यकारी समिती आणि इतर समित्या स्थापन करील.

(२) कार्यकारी समिती ही, पदसिद्ध सदस्य म्हणून अध्यक्ष व उपाध्यक्ष आणि परिषदेकडून विहित केलेल्या रीतीने सदस्यांमधून निवडून दिलेले इतर तीन सदस्य यांनी मिळून बनलेली असेल.

(३) परिषदेचा अध्यक्ष व उपाध्यक्ष हे, अनुक्रमे कार्यकारी समितीचे, अध्यक्ष व उपाध्यक्ष असतील.

(४) प्रबंधक, हा कार्यकारी समितीचा सचिव म्हणून काम करील.

(५) तीन इतक्या उपस्थित सदस्यांची गणपूर्ती झाल्याशिवाय, कार्यकारी समितीच्या कोणत्याही बैठकीचे कामकाज चालवण्यात येणार नाही.

(६) कार्यकारी समितीचा कोणताही सदस्य, परिषदेचा सदस्य म्हणून त्याचा पदावधी समाप्त होईतोपर्यंत पद धारण करील आणि तो त्या पदावर पुन्हा निवडला जाण्यास पात्र असेल.

(७) कोणत्याही सदस्यास, समितीच्या अध्यक्षाला उद्देशून आपल्या सहीनिशी लिहिलेल्या लेखी अर्जाद्वारे आपल्या सदस्यत्त्वाचा राजीनामा देता येईल आणि त्या अनुषंगाने रिक्त होणारे पद परिषदेकडून, जे आधीच समितीचे सदस्य नसतील अशा सदस्यांमधून एखाद्या दुसऱ्या सदस्याच्या निवडीद्वारे भरण्यात येईल.

(८) कार्यकारी समिती, विहित करण्यात येईल, अशा अधिकारांचा वापर करील आणि अशी कार्ये करील आणि अशी कर्तव्ये पार पाडील.

परिषदेचे उत्पन्न व खर्च.

**१२.** (१) परिषदेच्या उत्पन्नात पुढील बाबी समाविष्ट असतील :—

(क) व्यवसायींकडून मिळालेली फी ;

(ख) परिषदेला मिळालेल्या कोणत्याही रकमा तसेच देणग्या :

परंतु, परिषद, राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेशिवाय विदेशी नागरिक, निकाय, अभिकरण, संस्था किंवा सरकार यांच्याकडून कोणतीही देणगी स्वीकारणार नाही.

(२) परिषद, पुढील प्रयोजनांसाठी खर्च करण्यास सक्षम असेल :—

(क) परिषदेच्या सेवेत असलेल्या प्रबंधकाचे आणि इतर कर्मचारीवर्गाचे वेतन व भत्ते ;

(ख) परिषदेचे आणि कार्यकारी समितीचे सदस्य यांना द्यावयाची फी व भत्ते ;

(ग) न्यायसहायकांना द्यावयाचे पारिश्रमिक ; आणि

(घ) या अधिनियमाखालील अधिकारांचा वापर करणे, कार्ये करणे व कर्तव्ये पार पाडणे यांसाठी आवश्यक असतील असे इतर खर्च.

प्रबंधक. **१३.** (१) परिषद, राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीने, विहित करण्यात येईल अशी अर्हता धारण करणाऱ्या प्रबंधकाची नियुक्ती करील.

(२) कार्यकारी समितीस, वेळोवेळी, प्रबंधकाला रजा मंजूर करता येईल :

परंतु, रजेचा कालावधी हा ३० दिवसांपेक्षा अधिक नसेल तेव्हा, अशी रजा अध्यक्षास मंजूर करता येईल.

(३) रजेवर गेल्यामुळे किंवा अन्य कोणत्याही कारणामुळे प्रबंधकाचे पद तात्पुरते रिक्त होईल अशा कोणत्याही कालावधीत, उप प्रबंधक हा प्रबंधक म्हणून काम करील. प्रबंधक आणि उप प्रबंधक हे दोन्हीही अनुपस्थित असतील तेव्हा, कार्यकारी समितीस, राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेने त्याच्या जागी काम करण्यासाठी म्हणून इतर कोणत्याही व्यक्तीची नियुक्ती करता येईल आणि याप्रमाणे नियुक्त करण्यात आलेली कोणतीही व्यक्ती ही, अशा नियुक्तीच्या कालावधीत, या अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता प्रबंधक असल्याचे मानण्यात येईल :

परंतु, अशा रिक्त पदाचा कालावधी हा, ३० दिवसांपेक्षा अधिक नसेल तेव्हा, अशी नियुक्ती अध्यक्षास करता येईल व तो अशी नियुक्ती केल्याचे कार्यकारी समितीला आणि राज्य शासनाला ताबडतोब कळवील.

(४) परिषदेस, शासनाच्या पूर्वमंजुरीने, प्रबंधक म्हणून नेमण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीला पदावरून निलंबित करता येईल, बडतर्फ करता येईल किंवा काढून टाकता येईल किंवा त्याच्यावर इतर कोणतीही शास्ती लादता येईल :

परंतु, या पोट कलमाखाली कोणताही आदेश देण्यापूर्वी, प्रबंधकाला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात येईल.

(५) या अधिनियमाद्वारे अन्यथा तरतूद करण्यात आली असेल ते खेरीज करून, प्रबंधकाचे वेतन व भत्ते आणि त्याच्या सेवेच्या इतर शर्ती ह्या, विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

(६) प्रबंधक हा, परिषदेचा पदसिद्ध-सचिव आणि कार्यकारी अधिकारी असेल. तो, परिषदेने घटित केलेल्या इतर समित्या, कोणत्याही असल्यास, यांचा सचिव म्हणूनही काम करील.

(७) तो परिषदेच्या, कार्यकारी समितीच्या आणि इतर समित्यांच्या सर्व बैठकींना उपस्थित राहील आणि अशा बैठकींचे कार्यवृत्त, त्या बैठकींना उपस्थित असलेल्या सदस्यांची नावे व अशा बैठकीतील कामकाज यांची नोंद ठेवील.

(८) प्रबंधक, विहित केलेल्या रीतीने परिषदेचे लेखे ठेवील.

(९) प्रबंधकास, विहित करण्यात येतील असे कर्मचारीवर्गाचे पर्यवेक्षण करण्याचे अधिकार असतील, आणि त्यास, या अधिनियमात विनिर्दिष्ट करण्यात येतील, किंवा विहित करण्यात येतील अशी इतर कामे व कर्तव्ये पार पाडता येतील.

(१०) प्रबंधक हा, भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थांतर्गत लोकसेवक असल्याचे मानण्यात १८६० चा ४५.
येईल.

परिषदेचे इतर कर्मचारी. **१४.** (१) प्रबंधकाखेरीज, परिषदेस, या अधिनियमाखालील कामे आणि कर्तव्ये पार पाडण्यासाठी तिला आवश्यक व इष्ट वाटतील अशा, एक किंवा अधिक उप प्रबंधकांची आणि असे इतर अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती करता येईल :

परंतु, अशा अधिकाऱ्यांची आणि कर्मचाऱ्यांची संख्या व पदनामे आणि त्यांचे वेतन व भत्ते हे, परिषदेकडून शासनाच्या पूर्वमंजुरीने निर्धारित करण्यात येतील.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, मात्र, याबाबतीत परिषदेकडून निर्धारित करण्यात येईल अशा आर्थिक मर्यादेस अधीन राहून, कार्यकारी समिती ही, कोणतेही तात्पुरते वाढलेले काम किंवा हंगामी स्वरूपाचे कोणतेही काम पार पाडण्यासाठी, लिपिकांची व कर्मचाऱ्यांची पदे, विहित करण्यात येईल अशा मुदतीकरिता निर्माण करण्यास आणि त्यावर नियुक्त्या करण्यास, सक्षम असेल.

(३) अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या सेवेच्या इतर शर्ती ह्या, विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

१८६० चा ४५. (४) या अधिनियमान्वये नियुक्त करण्यात आलेले अधिकारी व कर्मचारी हे, भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थांतर्गत लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

प्रकरण तीन

## परिषदेचे अधिकार, कार्ये व कर्तव्ये

**१५.** (१) या अधिनियमाच्या तरतुदींद्वारे किंवा त्याअन्वये विहित करण्यात येतील अशा शर्तीस अधीन राहून, परिषदेचे अधिकार, कार्ये व कर्तव्ये ही पुढीलप्रमाणे असतील :— परिषदेचे अधिकार, कार्ये व कर्तव्ये.

(क) या अधिनियमाखालील ॲक्यूपंक्चर व्यवसायी आणि ॲक्यूपंक्चर कर्मचारी यांची नोंदवही ठेवणे ;

(ख) प्रबंधकाच्या कोणत्याही निर्णयाविरुद्ध केलेल्या अपिलांची सुनावणी करणे व त्यांवर निर्णय देणे ;

(ग) ॲक्यूपंक्चर व्यवसायी व ॲक्यूपंक्चर कर्मचारी यांच्या व्यवसायविषयक वर्तणुकीचे विनियमन करण्यासाठी नीति-संहिता विहित करणे ;

(घ) ॲक्यूपंक्चर संस्था स्थापन करण्यासाठी परवानगी देण्याबद्दलच्या शर्तींचे विनियमन करणे आणि परिषदेकडून कोणतीही मान्यताप्राप्त अर्हता प्रदान करणारा नवीन अभ्यासक्रम सुरू करणे किंवा प्रशिक्षण देणे किंवा अशा एखाद्या अभ्यासक्रमासाठीच्या प्रवेश क्षमतेत वाढ करणे ;

(ङ) ॲक्यूपंक्चर संस्था स्थापन करणे, परिषदेकडून कोणतीही मान्यताप्राप्त अर्हता प्रदान करणारा नवीन अभ्यास किंवा प्रशिक्षण पाठ्यक्रम सुरू करणे किंवा अशा एखाद्या पाठ्यक्रमासाठीच्या प्रवेश क्षमतेत वाढ करणे यांसाठीची परवानगी देणे किंवा ती परवानगी नाकारणे ;

(च) ॲक्यूपंक्चर संस्थेस संलग्नता देण्याबद्दलच्या शर्तींचे विनियमन करणे ;

(छ) ॲक्यूपंक्चर संस्थांना संलग्नता देणे किंवा ती संलग्नता नाकारणे किंवा त्या संस्थेच्या प्राधिकाऱ्यांना आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात आल्यानंतर, अशी मान्यता काढून घेणे ;

(ज) ॲक्यूपंक्चरमधील अर्हतांना आणि तिच्या संशोधन संस्थांना मान्यता देण्याबद्दलच्या शर्तींचे विनियमन करणे ;

(झ) ॲक्यूपंक्चरमधील संशोधन संस्था आणि अर्हता यांना मान्यता देणे किंवा ती मान्यता नाकारणे किंवा संस्थेच्या संबंधित प्राधिकाऱ्यांना आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर अशी मान्यता काढून घेणे ;

(ञ) संलग्न आणि मान्यताप्राप्त संस्थांच्या तपासणीकरिता तरतूद करणे ;

(ट) नोंदणीकृत किंवा नावनोंदणी केलेले ॲक्यूपंक्चर व्यवसायी किंवा ॲक्यूपंक्चर कर्मचारी यांना समज देणे किंवा त्यांना निलंबित करणे किंवा त्यांचे नाव नोंदवहीतून काढून टाकणे किंवा परिषदेच्या मते आवश्यक किंवा इष्ट असेल अशी इतर कोणतीही शिस्तभंगाची कारवाई त्याच्याविरुद्ध करणे ;

(ठ) परिषदेशी संलग्न असलेल्या संस्थेच्या किंवा संलग्नतेसाठी अर्ज करणाऱ्या संस्थेच्या प्राधिकाऱ्याला, परिषदेस संस्थेच्या कार्यक्षमतेचे मूल्यांकन करण्यासाठी आवश्यक वाटतील असे अहवाल, विवरणे किंवा इतर माहिती, विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीच्या आत सादर करण्यास फर्मावणे ;

(ड) परिषदेकडून पदविका किंवा प्रमाणपत्र देण्यासाठी, त्याबाबत प्रसिद्ध केलेल्या जागतिक आरोग्य संघटनेच्या शिफारशींशी सुसंगत नसलेला ॲक्यूपंक्चर चिकित्सा पद्धतीमधील अभ्यास व प्रशिक्षण पाठ्यक्रम विनियमांद्वारे विहित करणे ;

(ढ) ॲक्यूपंक्चर व्यवसायी आणि ॲक्यूपंक्चर कर्मचारी यांच्या नोंदणीच्या प्रयोजनार्थ परिषदेकडून घेण्यात येणाऱ्या किंवा घेण्याची व्यवस्था केलेल्या पात्रता चाचणीची, त्याबाबत प्रसिद्ध केलेल्या जागतिक आरोग्य संघटनेच्या शिफारशींशी सुसंगत नसलेली योजना आणि पाठ्यक्रम विनियमांद्वारे विहित करणे ;

(ण) संलग्न संस्थांच्या विद्यार्थ्यांची परीक्षा घेणे आणि अशा परीक्षा घेण्यासाठी आवश्यक ती सर्व व्यवस्था करणे ;

(त) परिषदेशी संलग्न असलेल्या संस्थांचे सर्वसाधारण पर्यवेक्षण व नियंत्रण करणे, आणि अशा संस्थांना, परिषदेच्या मते आवश्यक आणि इष्ट असतील असे निदेश देणे ;

(थ) ॲक्यूपंक्चर चिकित्सा पद्धतीचे शिक्षण देणाऱ्या संस्थांच्या तपासणीकरिता, परिषदेला योग्य वाटेल अशा संख्येत, परिषद निर्धारित करील अशा अटींवर निरीक्षकांची नियुक्ती करणे ;

(द) ॲक्यूपंक्चरमधील संशोधनाच्या बाबतीत राज्य शासनाला सल्ला देणे ;

(ध) या अधिनियमामध्ये निर्धारित करण्यात येतील किंवा विहित करण्यात येतील किंवा या अधिनियमाच्या उद्दीष्टांच्या पुरस्सरणार्थ, राज्य शासन **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे निदेशित करील अशा इतर अधिकारांचा वापर करणे, अशी इतर कार्ये करणे किंवा अशी इतर कर्तव्ये पार पाडणे ;

(न) परिषदेच्या मते, ज्यांनी ॲक्यूपंक्चर व्यवसायी म्हणून नावलौकिक मिळविलेला असेल अशा व्यक्तींना मानसेवी पदविका प्रदान करणे ;

(प) देणग्या स्वीकारणे आणि देणग्या स्वीकारण्यासंबंधीच्या शर्ती निर्धारित करणे.

(२) परिषदेस ॲक्यूपंक्चरमधील प्रमाणपत्र व पदविका अभ्यास व प्रशिक्षण पाठ्यक्रम संचालित करता येतील.

नवीन संस्था स्थापन करणे, नवीन अभ्यास पाठ्यक्रम इत्यादींसाठी परवानगी.

**१६.** (१) या अधिनियमामध्ये किंवा त्या त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनाकडून अधिसूचित करण्यात येईल अशा दिनांकापासून या अधिनियमाच्या तरतुदींनुसार परिषदेची पूर्वपरवानगी घेतल्याशिवाय,—

(क) कोणतीही व्यक्ती ॲक्यूपंक्चर संस्था स्थापन करणार नाही ; किंवा

(ख) कोणतीही ॲक्यूपंक्चर संस्था,—

(एक) परिषदेकडून कोणतीही मान्यताप्राप्त अर्हता प्रदान करणारा अभ्यास किंवा प्रशिक्षण पाठ्यक्रम सुरू करणार नाही ; किंवा

(दोन) कोणत्याही अभ्यास किंवा प्रशिक्षण पाठ्यक्रमाची प्रवेश क्षमता वाढविणार नाही.

(२) परिषद, या अधिनियमाच्या प्रारंभानंतर, शक्य तितक्या लवकर, परिषदेची परवानगी, संलग्नता आणि मान्यता मिळण्यासाठी अर्ज करण्याची आणि तसेच अशी परवानगी, संलग्नता आणि मान्यता देण्याची किंवा ती नाकारण्याची कार्यपद्धती, विनियमांद्वारे विहित करील.

**स्पष्टीकरण.**— या कलमाच्या प्रयोजनार्थ, "व्यक्ती" यामध्ये कोणतेही विद्यापीठ किंवा न्यास किंवा सोसायटी किंवा संस्था यांचा समावेश होईल, परंतु त्यामध्ये, राज्य शासन किंवा केंद्र सरकार किंवा परिषद यांचा समावेश होणार नाही.

विवक्षित प्रकरणांत अर्हतेस मान्यता न देणे.

**१७.** (१) हा अधिनियम अंमलात आल्यानंतर, विहित रीतीने परिषदेची पूर्वपरवानगी न घेता कोणतीही ॲक्यूपंक्चर संस्था स्थापन करण्यात आली असेल तेव्हा अशा संस्थेच्या कोणत्याही विद्यार्थ्याला दिलेली कोणतीही ॲक्यूपंक्चरविषयक अर्हता ही, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ मान्यताप्राप्त ॲक्यूपंक्चर अर्हता असणार नाही.

(२) कोणतीही ॲक्यूपंक्चर संस्था, विहित रीतीने परिषदेची पूर्वपरवानगी न घेता नवीन ॲक्यूपंक्चर अभ्यास किंवा प्रशिक्षण पाठ्यक्रम सुरू केला असेल तेव्हा, त्याबाबतीत, अशा अभ्यास किंवा प्रशिक्षण पाठ्यक्रमाच्या आधारावर अशा संस्थेच्या कोणत्याही विद्यार्थ्याला दिलेली अर्हता ही, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ मान्यताप्राप्त ॲक्यूपंक्चर अर्हता असणार नाही.

(३) कोणतीही ॲक्यूपंक्चर संस्था, विहित रीतीने परिषदेची पूर्वपरवानगी न घेता, कोणत्याही अभ्यास किंवा प्रशिक्षण पाठ्यक्रमाच्या प्रवेश क्षमतेमध्ये वाढ करील त्याबाबतीत ज्या वाढीव प्रवेश क्षमतेच्या आधारावर अशा संस्थेच्या कोणत्याही विद्यार्थ्याला दिलेली कोणतीही ॲक्यूपंक्चर अर्हता ही, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, मान्यताप्राप्त ॲक्यूपंक्चर अर्हता असणार नाही.

**स्पष्टीकरण.—** या कलमाच्या प्रयोजनार्थ, अशा अनधिकृत वाढीव प्रवेश क्षमतेच्या आधारावर ज्याला ॲक्यूपंक्चर अर्हता देण्यात आली असेल असा विद्यार्थी ओळखण्याचे निकष, विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

**१८.** (१) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी, जिने ॲक्यूपंक्चर संस्था स्थापन केली असेल अशी कोणतीही व्यक्ती, शासनाने **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट केली असेल अशा कालावधीच्या आत, विहित रीतीने परिषदेची परवानगी प्राप्त करील.

विवक्षित विद्यमान ॲक्यूपंक्चर संस्थांसाठी परवानगी प्राप्त करण्याचा कालावधी.

(२) जर अशा कोणत्याही व्यक्तीने पोट-कलम (१) अन्वये परवानगी प्राप्त करण्यात कसूर केल्यास, त्याबाबतीत कलम १७ च्या तरतुदी ह्या, शक्य असेल तेथवर, जणू काही कलम १६ अन्वये परिषदेची परवानगी नाकारण्यात आली आहे असे समजून त्याप्रमाणे लागू होतील.

प्रकरण चार

## नोंदवही तयार करणे व ठेवणे

**१९.** (१) परिषद, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात ॲक्यूपंक्चर व्यवसायी व ॲक्यूपंक्चर कर्मचारी यांची नोंदवही ठेवील.

नोंदवही तयार करणे.

(२) प्रबंधक, ज्यांच्या नावांची नोंदणी करावयाची आहे अशा व्यक्ती, त्यांची अर्हता, त्यांचे पत्ते यासंबंधात नोंदवहीत, वेळोवेळी आवश्यक त्या नोंदी करील आणि तसेच त्यास परिषदेने दिलेल्या कोणत्याही आदेशांच्या परिणामी आवश्यक असेल त्याप्रमाणे त्यात, वेळोवेळी, असे फेरफार व फेरबदल करता येतील.

**२०.** (१) हा अधिनियम ज्या दिवशी अंमलात येईल त्या दिवसानंतर शक्य तितक्या लवकर, प्रबंधक, ॲक्यूपंक्चर व्यवसायी व ॲक्यूपंक्चर कर्मचारी यांची नोंदवही तयार करील व ती ठेवील.

व्यक्ती, नोंदणी करण्यास हक्कदार असणे.

(२) ती नोंदवही भाग अ, भाग ब व भाग क अशा तीन भागांत विभागण्यात येईल. भाग अ व भाग ब मध्ये ॲक्यूपंक्चर व्यवसायींची नावे व त्यांच्याविषयीची इतर माहिती यांचा अंतर्भाव असेल आणि भाग क मध्ये ॲक्यूपंक्चर कर्मचाऱ्यांची नावे व त्यांच्याविषयीची इतर माहिती यांचा अंतर्भाव असेल.

(३) जी व्यक्ती,—

(क) भारतातील सांविधिक विद्यापीठाने प्रदान केलेली, ॲक्यूपंक्चर पदवी किंवा पदविका धारण करते आणि ज्यादिवशी हा अधिनियम अंमलात येईल त्या दिवशी, जिच्या नावाची राज्य ॲक्यूपंक्चर व्यवसायी नोंदवहीत नोंद केलेली असेल ; किंवा

(ख) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने प्रदान केलेली, ॲक्यूपंक्चर पदवी धारण करते ; किंवा

(ग) नोंदणीकृत वैद्यक व्यवसायी आहे आणि परिषदेने प्रदान केलेली पदविका धारण करते ; किंवा

(घ) नोंदणीकृत वैद्यक व्यवसायी आहे आणि कोणतीही मान्यताप्राप्त ॲक्यूपंक्चर अर्हता धारण करते,

अशी प्रत्येक व्यक्ती, या अधिनियमाअन्वये ठेवलेल्या नोंदवहीच्या भाग अ मध्ये आपले नाव विण्यासाठी हक्कदार असेल.

(४) जी व्यक्ती,—

(क) भारतातील कोणत्याही सांविधिक राज्य परिषदेने किंवा विद्यापीठाने प्रदान केलेली ॲक्यूपंक्चर पदविका धारण करते आणि ज्या दिवशी हा अधिनियम अंमलात येईल त्या दिवशी, जिच्या नावाची संबंधित परिषदेने ठेवलेल्या राज्य ॲक्यूपंक्चर व्यवसायींच्या नोंदवहीत नोंद केलेली असेल ; किंवा

(ख) परिषदेने प्रदान केलेली पदविका धारण करते ; किंवा

(ग) जिला, परिषदेने मानद पदविका प्रदान केलेली आहे ; किंवा

(घ) भारतातील किंवा भारताबाहेरील संस्थेने प्रदान केलेली व मान्यताप्राप्त ॲक्यूपंक्चर अर्हता असलेली कोणतीही अर्हता धारण करते ; परंतु, जिचे नाव कोणत्याही राज्य ॲक्यूपंक्चर व्यवसायींच्या नोंदवहीत नोंदविलेले नाही ; किंवा

(ङ) ॲक्यूपंक्चर व्यवसायी म्हणून नोंदणी करण्यासाठी परिषदेने घेतलेल्या किंवा घेण्याची व्यवस्था केलेल्या पात्रता चाचणीत अर्ह ठरली आहे ;

अशी प्रत्येक व्यक्ती, या अधिनियमान्वये ठेवलेल्या नोंदवहीच्या भाग ब मध्ये आपले नाव नोंदविण्यासाठी हक्कदार असेल.

(५) जी व्यक्ती,—

(क) ॲक्यूपंक्चर कर्मचारी म्हणून नोंदणी करण्यासाठी परिषदेने घेतलेल्या किंवा घेण्याची व्यवस्था केलेल्या पात्रता चाचणीत अर्ह ठरली आहे ;

(ख) परिषदेने प्रदान केलेली, ॲक्यूपंक्चर पदविका किंवा प्रमाणपत्र धारण करते ;

अशी प्रत्येक व्यक्ती, या अधिनियमाअन्वये ठेवलेल्या नोंदवहीच्या भाग क मध्ये आपले नाव नोंदविण्यासाठी हक्कदार असेल.

नोंदणीसाठी अर्ज.

**२१.** (१) नोंदवहीत आपले नाव नोंदविण्यासाठी इच्छुक असणारी प्रत्येक व्यक्ती, विहित नमुन्यातील अर्ज विहित रीतीने प्रबंधकाला सादर करील.

(२) एखादी व्यक्ती कलम २० अन्वये नोंदणी करण्यासाठी अर्ह ठरली असल्याची खात्री पटल्यावर परिषदेस, तिच्या नावाची नोंदवहीत नोंद घेण्याचे निदेश देता येतील आणि प्रबंधक, त्यानंतर त्या नोंदवहीत आवश्यक त्या नोंदी करील आणि त्या व्यक्तीला नोंदणी प्रमाणपत्र देईल.

परिषदेचा विवक्षित प्रकरणी नोंदणी नाकारण्याचा किंवा नोंदवहीतून नाव काढून टाकण्याचा अधिकार.

**२२.** (१) परिषदेस, एखादी व्यक्ती,—

(क) जिला नैतिक अध:पतनाचा अंतर्भाव असणाऱ्या कोणत्याही अपराधाबद्दल दोषी ठरविण्यात आले असेल ; किंवा

(ख) जिला, आपल्या व्यावसायिक संबंधातून केलेल्या घृणास्पद वर्तणुकीबद्दल, तिच्या वर्तणुकीची यथोचित चौकशी करून परिषदेच्या किमान दोन-तृतीयांश इतक्या सदस्यांच्या बहुमताने, दोषी ठरविण्यात आले असेल,

अशा कोणत्याही व्यक्तीच्या नाव नोंदणीस परवानगी नाकारण्याचा किंवा नोंदवहीतून तिचे नाव काढून टाकण्याचा निदेश देता येईल :

परंतु, अशा व्यक्तीला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज असा कोणताही नकार देता येणार नाही किंवा तिचे नाव काढून टाकता येणार नाही :

परंतु आणखी असे की, ज्या वर्तणुकीच्या आधारे परवानगी नाकारण्याचा किंवा नाव काढून टाकण्याचा निदेश देण्यात आला होता ती वर्तणूक उचित आणि पुरेशा कारणांस्तव परिषदेने क्षमापित केली असेल तर परिषदेस या पोट-कलमाखालील परवानगी नाकारण्याचा किंवा नाव काढून टाकण्याचा कोणताही निदेश विखंडित करता येईल :

परंतु तसेच, ज्या व्यक्तीचे नाव नोंदवहीतून काढून टाकण्यात आले असेल तर अशी कोणतीही व्यक्ती, तात्काळ तिचे नोंदणी प्रमाणपत्र परिषदेला प्रत्यार्पित करील.

(२) परिषदेस, जिचे नाव नोंदवहीत नोंदविण्यात आले असेल अशा व्यक्तीच्या मृत्युबाबतची विश्वसनीय माहिती प्राप्त झाल्यावर आणि तिला योग्य वाटेल अशी चौकशी केल्यावर तिचे नाव नोंदवहीतून काढून टाकण्याचा निदेश देता येईल आणि त्यानंतर, प्रबंधक, अशा व्यक्तीसंबंधीची नोंद रद्द करील.

(३) पोट-कलम (१) च्या खंड (ख) अन्वये कोणतीही चौकशी करताना, पुढील बाबींच्या संबंधात दाव्याची न्यायचौकशी करताना, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये दिवाणी न्यायालयाला जे अधिकार निहित असतात तेच अधिकार परिषदेस असतील :— (१९०८ चा ५.)

(क) कोणत्याही व्यक्तीस हजर राहण्यास भाग पाडणे व तिची शपथेवर तपासणी करणे ;

(ख) दस्तऐवज सादर करण्यास भाग पाडणे ;

(ग) साक्षीदारांची तपासणी करण्यासाठी आयोगपत्रे काढणे.

(१८६० चा ४५.) (४) या कलमाखालील सर्व चौकशींना, भारतीय दंड संहितेची कलमे १९३, २१९ व २२८ यांच्या अर्थानुसार न्यायालयीन कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल.

(५) या कलमाखालील कोणत्याही चौकशीत उद्भवणाऱ्या, कोणत्याही कायदेविषयक प्रश्नावर परिषदेला सल्ला देण्याच्या प्रयोजनासाठी, अशा सर्व चौकशींमध्ये, ज्याने दहा वर्षांपेक्षा कमी नसेल एवढ्या कालावधीसाठी अधिवक्ता म्हणून अधिवक्ता अधिनियम, १९६१ खाली नावनोंदणी केलेली आहे असा एक न्यायसहायक असेल.

(१९६१ चा २५.) (६) पोट-कलम (५) अन्वये कोणत्याही न्यायसहायकाची एकतर सर्वसाधारण चौकशीसाठी किंवा कोणत्याही विशिष्ट चौकशीसाठी किंवा चौकशींच्या वर्गासाठी नेमणूक करता येईल आणि त्यास विहित करण्यात येईल असे पारिश्रमिक देण्यात येईल.

लबाडीच्या व चुकीच्या नोंदी रद्द करणे.

**२३.** नोंदवहीतील कोणतीही नोंद ही, लबाडीने किंवा चुकीने करण्यात आली असल्याबाबत परिषदेचे समाधान होईल इतपत ते सिद्ध झाल्यास, अशी कोणतीही नोंद परिषदेच्या आदेशाने रद्द करता येईल.

## प्रकरण पाच

## अपराध व शास्ती

नोंदणी केली असल्याचा खोटा दावा करणाऱ्या अनोंदणीकृत व्यक्तीस शास्ती करणे.

**२४.** ज्या कोणत्याही व्यक्तीचे नाव नोंदवहीत नोंदविण्यात आले नसेल अशा व्यक्तीने, ते अशा रीतीने नोंदविण्यात आले आहे असे खोटे अभिवेदन करील किंवा ज्यामुळे तिचे नाव अशा रीतीने नोंदविण्यात आले आहे असा समज होईल अशा तऱ्हेने आपल्या नावाच्या किंवा किताबाच्या संबंधात कोणत्याही शब्दांचा किंवा अक्षरांचा वापर करील तर, तिला–मग कोणत्याही व्यक्तीची अशा अभिवेदनाने प्रत्यक्षात फसवणूक झालेली असो किंवा नसो–अपराधसिद्धिनंतर, अधिकारिता असणाऱ्या महानगर दंडाधिकाऱ्याकडून किंवा प्रथम वर्ग न्याय दंडाधिकाऱ्याकडून, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा दोन्हीही शिक्षा होतील.

नोंदणी प्रमाणपत्र प्रत्यर्पित करण्यात कसूर केल्याबद्दल शास्ती.

**२५.** (१) कलम २२ अन्वये नोंदवहीतून जिचे नाव काढून टाकण्यात आले आहे अशा कोणत्याही व्यक्तीने पुरेशा कारणाशिवाय, आपले नोंदणी प्रमाणपत्र तात्काळ प्रत्यार्पित करण्यात कसूर केली तर, तिला एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

(२) परिषदेच्या आदेशाने केलेल्या तक्रारीव्यतिरिक्त, या कलमाखालील कोणत्याही शिक्षापात्र अपराधाची दखल घेतली जाणार नाही.

पदवी, पदविका, इत्यादींच्या अनधिकृत प्रदानास प्रतिबंध व अशा प्रदानाबद्दल शास्ती.

**२६.** (१) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाव्यतिरिक्त, संघ किंवा संस्था–मग ती कोणतीही व्यक्ती, कोणत्याही नावाने संबोधण्यात येवो हे धारक, प्रतिग्रहिता किंवा ग्रहिता हा ॲक्यूपंक्चर चिकित्सा पद्धतीचा व्यवसाय करण्यास अर्ह आहे असे नमूद करणारी किंवा ध्वनित करणारी कोणतीही पदवी किंवा इतर कोणताही दस्तऐवज प्रदान करणार नाहीत किंवा देणार नाहीत किंवा निर्गमित करणार नाहीत किंवा तो प्रदान करण्याचा, देण्याचा किंवा काढण्याचा आपणास हक्क आहे अशी धारणा करून देणार नाहीत.

(२) परिषदेव्यतिरिक्त, कोणतीही व्यक्ती, संघ किंवा संस्था–मग ती कोणत्याही नावाने संबोधण्यात येवो हे, धारक, प्रतिग्रहिता किंवा ग्रहिता हा ॲक्यूपंक्चर चिकित्सा पद्धतीचा व्यवसाय करण्यासाठी अर्ह आहे असे नमूद करणारी किंवा ध्वनित करणारी कोणतीही पदविका, अनुज्ञप्ती (लायसन), प्रमाणपत्र किंवा इतर कोणताही दस्तऐवज प्रदान करणार नाहीत किंवा देणार नाहीत किंवा निर्गमित करणार नाहीत किंवा ते प्रदान करण्याचा, देण्याचा किंवा निर्गमित करण्याचा आपणास हक्क आहे अशी धारणा करून देणार नाहीत.

(३) कोणतीही व्यक्ती जी पोट-कलम (१) किंवा (२) यांच्या तरतुदींचे कोणतेही उल्लंघन करील त्यास, अपराधसिद्धीनंतर एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या कारावासाची शिक्षा किंवा दहा हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा त्या दोन्हीही शिक्षा होतील, आणि जर एखादा संघ किंवा संस्था अशा उल्लंघनाबद्दल दोषी असेल तर, जो जाणून बुजून किंवा त्यास बुद्धिपुरस्सर उल्लंघन होऊ देईल किंवा त्यास परवानगी देईल अशा तिच्या प्रत्येक सदस्यास अपराधसिद्धीनंतर, एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या कारावासाची शिक्षा किंवा दहा हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा दोन्हीही शिक्षा होतील.

ॲक्यूपंक्चर अर्हतांच्या अनुचित धारणेबद्दल शास्ती.

२७. (१) कोणतीही व्यक्ती, ॲक्यूपंक्चर चिकित्सा पद्धतीमधील कोणतीही पदवी, अशी पदवी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने प्रदान केली असल्याखेरीज, ती धारण करते हे दर्शविणाऱ्या किंवा ध्वनित करणाऱ्या तिच्या नावानंतर कोणतीही अक्षरे किंवा आकडे यांचा वापर करणार नाही.

(२) कोणतीही व्यक्ती, ॲक्यूपंक्चर चिकित्सा पद्धतीमधील कोणतीही पदविका,अनुज्ञप्ती (लायसन) किंवा प्रमाणपत्र, अशी पदविका, अनुज्ञप्ती (लायसन) किंवा प्रमाणपत्र हे, परिषदेने प्रदान केले असल्याखेरीज किंवा त्यास मान्यता दिली असल्याखेरीज, ती धारण करते हे दर्शविणाऱ्या किंवा ध्वनित करणाऱ्या तिच्या नावानंतर कोणतीही अक्षरे किंवा आकडे यांचा वापर करणार नाही.

(३) जो कोणी पोट-कलम (१) किंवा (२) च्या तरतुदींचे उल्लंघन करील तो अपराधसिद्धीनंतर शिक्षापात्र असेल व त्यास पहिल्या अपराधसिद्धीनंतर, पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल आणि पहिल्या अपराधसिद्धिनंतर असा अपराध करण्याचे चालू राहील तेथे अशा प्रत्येक अपराधासाठी दहा हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

नोंदणीकृत व्यवसायींची नोंदणी सूची प्रसिद्ध करणे व तिचा वापर करणे.

२८. प्रबंधक, वेळोवेळी, आवश्यक असेल अशा प्रसंगी, परिषदेने याबाबतीत निश्चित करावयाच्या दिनांकास किंवा त्यापूर्वी नोंदवहीत पुढील तपशील नोंदवून त्या त्या वेळी नोंद करण्यात आलेल्या नावांची एक अचूक सूची छापण्याची व ती प्रसिद्ध करण्याची व्यवस्था करील (परंतु शेवटच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून किमान बारा महिन्यांचा काळ लोटला जावा) :—

(क) आडनावानुसार वर्णानुक्रमे लावलेली सर्व नोंदणीकृत ॲक्यूपंक्चर व्यवसायी व ॲक्यूपंक्चर कर्मचारी यांची नावे ;

(ख) अशा प्रत्येक व्यक्तीचा नोंदणीकृत पत्ता ; आणि

(ग) अशा प्रत्येक व्यक्तीची नोंदणीकृत अर्हता आणि प्रत्येक अर्हता ज्या दिनांकास प्राप्त केली तो दिनांक.

(२) प्रबंधक, पोट-कलम (१) अन्वये सूची प्रसिद्ध केल्यापासून, वेळोवेळी, प्रसंग उद्‌भवेल त्याप्रमाणे, नोंदवहीत भर घालून व त्यात फेरफार करून त्यासह तिची पुरवणी सूची छापण्याची व प्रसिद्ध करण्याची व्यवस्था करील.

(३) प्रत्येक न्यायालय, पोट-कलम (१) अन्वये छापलेल्या व प्रसिद्ध केलेल्या अलिकडच्या सूचीमध्ये तसेच, पोट-कलम (२) अन्वये छापलेल्या व प्रसिद्ध केलेल्या अलिकडच्या पुरवणी सूचीमध्ये जर असल्यास, जिच्या नावाची नोंद केली आहे अशा कोणत्याही व्यक्तीची या अधिनियमाअन्वये यथोचितरीत्या नोंदणी केली असल्याचे आणि जिच्या नावाची अशा रीतीने नोंद केलेली नाही अशा कोणत्याही व्यक्तीची या अधिनियमान्वये नोंदणी केली नसल्याचे गृहीत धरील:

परंतु, पोट-कलम (१) अन्वये छापलेल्या व प्रसिद्ध केलेल्या अलिकडच्या सूचीमध्ये तसेच पोट-कलम (२) अन्वये छापलेल्या व प्रसिद्ध केलेल्या अलिकडच्या पुरवणी सूचीमध्ये, जर असल्यास, जिचे नाव प्रसिद्ध झाल्याचे दिसत नसेल अशा कोणत्याही व्यक्तीच्या बाबतीत, प्रबंधकाने स्वाक्षरी केलेली, नोंदवहीतील अशा व्यक्तीच्या नावाच्या नोंदीची प्रमाणित प्रत ही, या अधिनियमान्वये अशा व्यक्तीची नोंदणी झाली असल्याचा पुरावा असेल.

२९. (१) कलमे २४, २५, २६ व २७ खालील सर्व अपराध हे, दखलपात्र व अजामीनपात्र असतील. अपराधांची दखल घेणे.

१९७४ चा २. (२) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणतेही न्यायालय, परिषदेने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या व्यक्तीकडून लेखी तक्रार करण्यात आल्याखेरीज, या अधिनियमाखालील शिक्षापात्र अपराधाची दखल घेणार नाही.

प्रकरण सहा

**संकीर्ण**

३०. (१) नोंदवहीच्या भाग अ व ब मध्ये ज्याच्या नावाची नोंद केलेली आहे अशा नोंदणीकृत ॲक्यूपंक्चर व्यवसायी व्यतिरिक्त, कोणताही ॲक्यूपंक्चर व्यवसायी, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये स्थापन केलेले कोणतेही ॲक्यूपंक्चर रुग्णालय, मनोरुग्णालय, अपंगालय, दवाखाना किंवा सूतिकागृह यांमध्ये किंवा कोणत्याही संलग्न ॲक्यूपंक्चर संस्थेमध्ये ॲक्यूपंक्चर मधील वैद्यकीय अधिकारी किंवा अध्यापक म्हणून कोणतीही नेमणूक धारण करण्यास सक्षम असणार नाही. नोंदवहीच्या भाग अ व ब मध्ये नाव नोंदवलेल्या व्यक्तींचे विवक्षित विशेषाधिकार.

(२) नोंदवहीच्या भाग अ मध्ये नोंद केलेला ॲक्यूपंक्चर व्यवसायी हा, भारतीय साक्षीपुरावा अधिनियम,
१८७२ चा १. १८७२ याच्या कलम ४५ अन्वये कोणत्याही तपासकार्यात किंवा कोणत्याही न्यायालयात ॲक्यूपंक्चर चिकित्सा पद्धतीसंबंधीच्या कोणत्याही प्रकरणात तज्ज्ञ म्हणून अभिप्राय देण्यास हक्कदार असेल.

३१. उपकरणांच्या संबंधात त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्याच्या तरतुदींना अधीन राहून, राज्य शासनास, कारखानदार, संग्राहक व विक्रेते यांना विहित करण्यात येतील अशा शर्तींवर अनुज्ञप्ती (लायसन) मंजूर करून ॲक्यूपंक्चर उपकरणांची निर्मिती, साठा किंवा विक्री यांचे **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे विनियमन करण्याचा आणि त्यांवर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार असेल. ॲक्यूपंक्चर उपकरणांची निर्मिती, साठा व त्यांची विक्री यांवर नियंत्रण ठेवणे.

३२. राज्य शासनावर किंवा परिषदेवर किंवा कार्यकारी समितीवर किवा परिषदेने नियुक्ती केलेल्या कोणत्याही समितीवर किंवा प्रबंधकावर या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये प्रदान केलेल्या कोणत्याही अधिकारांचा वापर करून केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या किंवा करण्याचे वगळलेल्या कोणत्याही कृतीच्या किंवा गोष्टींच्या बाबतीत कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करण्यात येणार नाही. दाव्यास किंवा इतर कायदेशीर कार्यवाहीस रोध.

३३. (१) या अधिनियमाच्या कलम २२ अन्वये परिषदेच्या कोणत्याही निर्णयामुळे किंवा कोणत्याही आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस किंवा संस्थेस विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा रीतीने, अशा मुदतीत, अशा शर्तींवर आणि अशी फी प्रदान केल्यावर राज्य शासनाकडे अपील दाखल करता येईल. अपील.

(२) असे अपील दाखल झाल्यावर, राज्य शासनास संबंधित व्यक्तीला आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर आणि परिषदेशी विचारविनिमय केल्यानंतर, आदेश देता येईल, तो आदेश अंतिम व बंधनकारक असेल.

३४. (१) या अधिनियमान्वये देय असलेली सर्व फी, परिषदेकडे प्रदान करण्यात येईल. वित्त व लेखा.

(२) परिषदेच्या सर्व मत्ता आणि दायित्वे आणि परिषदेला मिळालेली सर्व फी, रकमा, दान, देणग्या आणि दाननिधी व तिने केलेली किंवा तिच्या वतीने करण्यात आलेले सर्व खर्च आणि संवितरणे, यांचा लेखा, विहित रितीने ठेवण्यात येईल.

(३) राज्य शासनाकडून याबाबतीत, प्रतिनियुक्त करण्यात येईल अशा राज्य शासनाच्या अधिकाऱ्याकडून लेख्याची वार्षिक लेखापरीक्षा करण्यात येईल आणि अशा लेखापरीक्षेचा अहवाल अशा अधिकाऱ्याकडून राज्य शासनाकडे व परिषदेकडे पाठविण्यात येईल.

३५. (१) राज्य शासनास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे आणि पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीस अधीन राहून नियम करता येतील. नियम करण्याचा अधिकार.

(२) विशेषतः आणि पूर्वगामी अधिकाराच्या सर्वसाधारणतेस बाध न येता, अशा नियमांमध्ये पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही बाबींसाठी तरतूद करता येईल :—

(क) परिषदेच्या व कार्यकारी समितीच्या सदस्यांची निवडणूक आणि उपाध्यक्षाची निवडणूक ;

(ख) परिषदेच्या बैठकी आयोजित करण्याची रीत ;

(ग) अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांनी पार पाडावयाची कार्ये ;

(घ) कार्यवाही समितीचे अधिकार व कार्ये ;

(ङ) प्रबंधकाची अर्हता, वेतन व भत्ते आणि सेवेच्या इतर शर्ती, प्रबंधकाकडून परिषदेची लेखे ठेवण्याची रीत, प्रबंधकाचे पर्यवेक्षीय अधिकार व कार्ये आणि कर्तव्ये आणि अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवेच्या इतर शर्ती ;

(च) ॲक्यूपंक्चर व्यवसायी आणि ॲक्यूपंक्चर कर्मचारी यांच्या नोंदवहीचा नमुना, नोंदवहीत नाव नोंदविण्यासाठीच्या अर्जाचा नमुना व अर्ज सादर करण्याची रीत ;

(छ) परिषदेने,—

(एक) कलम २२ च्या पोट-कलम (३) अन्वये चौकशी करण्याकरिता ;

(दोन) प्रबंधकाच्या निर्णयावरील अपिले निकालात काढण्याकरिता,—

अनुसरावयाची कार्यपद्धती ;

(ज) कलम ३१ अन्वये अनुज्ञप्ती (लायसन) मंजूर करण्यासाठीच्या शर्ती ;

(झ) या अधिनियमान्वये विहित करण्यात येतील किंवा विहित करण्याची आवश्यकता असेल अशा इतर कोणत्याही बाबी.

(३) या अधिनियमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा अधिक अधिवेशनात मिळून एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमात कोणताही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे एकमत होईल किंवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे एकमत होईल आणि असा निर्णय **राजपत्रात** अधिसूचित करतील तर, तो नियम, अशा निर्णयाची अधिसूचना **राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून केवळ फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल, किंवा, यथास्थिति, तो अंमलात येणार नाही. तथापि, असा कोणताही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

विनियम करण्याचे अधिकार.

**३६.** (१) परिषदेस, राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेने या अधिनियमान्वये तिचे कार्य पार पाडण्यासाठी व तिचे कर्तव्य बजावण्यासाठी, या अधिनियमाच्या तरतुदींशी किंवा त्याखाली केलेल्या नियमांशी विसंगत नसतील असे विनियम करता येतील.

(२) विशेषतः, आणि पूर्वगामी अधिकाराच्या सर्वसाधारणतेला बाध न येता, पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही बाबींसाठी अशा विनियमांमध्ये तरतूद करता येईल :—

(क) कार्यकारी समितीचे आणि परिषदेने नियुक्त केलेल्या समितीचे कामकाज चालवणे ;

(ख) ज्यावेळी व ठिकाणी प्रत्येक बैठक आयोजित करण्यात येईल अशी वेळ व ठिकाण ;

(ग) अशी बैठक बोलावण्यासाठी नोटिसा काढणे ;

(घ) तेथील कामकाज चालवणे ;

(ङ) परिषदेची परवानगी, संलग्नीता आणि मान्यता मिळविण्यासाठीची कार्यपद्धती ;

(च) ज्याकरिता या अधिनियमाद्वारे परिषदेला स्पष्टपणे किंवा ध्वनितार्थाने विनियम करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत अशी इतर कोणतीही बाब.

विनियम प्रसिद्ध करणे.

**३७.** या अधिनियमाखाली केलेले सर्व विनियम **राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात येतील.

**३८.** परिषद, तिचे कार्यवृत्त, अहवाल, तिच्या लेख्यांचा गोषवारा व इतर माहिती यांच्या प्रती मागितल्या जातील तेव्हा त्या राज्य शासनाला सादर करील. शासनाला अहवाल आणि माहिती सादर करणे.

**३९.** (१) परिषद, या अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्य शासनाकडून वेळोवेळी देण्यात येतील अशा निदेशांचे पालन करील. शासनाने निदेश देणे.

(२) या अधिनियमाखालील परिषदेचे अधिकार वापरण्याच्या, तिचे कार्य व तिची कर्तव्ये पार पाडण्याच्या संबंधात, परिषद व राज्य शासन यांच्यामध्ये कोणताही विवाद उद्‌भवल्यास, अशा विवादावरील राज्य शासनाचा निर्णय हा अंतिम असेल आणि तो परिषदेवर बंधनकारक असेल.

**४०.** (१) परिषदेने किंवा तिच्या अध्यक्षाने अथवा उपाध्यक्षाने, अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये तिला किंवा त्याला सोपविलेल्या अधिकारांचा वापर करण्यात कसूर केली आहे किंवा कर्तव्ये पार पाडण्यात सतत कसूर केली आहे किंवा या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये तिला किंवा त्याला प्रदान करण्यात आलेल्या कोणत्याही अधिकारांचा अतिरेक केला आहे किंवा दुरुपयोग केला आहे किंवा कलम ३९ अन्वये राज्य शासनाकडून देण्यात आलेल्या कोणत्याही निदेशांचे अनुपालन करण्यात जाणिवपूर्वक अथवा पुरेशा कारणांशिवाय कसूर केली आहे, असे राज्य शासनाला कोणत्याही वेळी दिसून आल्यास, राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, त्यात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीकरिता परिषदेला निष्प्रभावित करता येईल : परिषदेला निष्प्रभावित करण्याचा अधिकार.

परंतु, या पोट-कलमाअन्वये अधिसूचना काढण्यापूर्वी शासन, परिषदेला निष्प्रभावित का करण्यात येऊ नये याबाबतची कारणे दाखविण्यास परिषदेला वाजवी मुदत देईल आणि परिषदेचा खुलासा किंवा आक्षेप, कोणताही असल्यास, विचारात घेईल.

(२) परिषदेला निष्प्रभावित करण्यासाठी पोट-कलम (१) अन्वये अधिसूचना प्रसिद्ध केल्यावर,—

(क) परिषदेचे सर्व सदस्य, परिषदेला निष्प्रभावित करण्याच्या दिनांकास त्यांचा पदावधी संपलेला नसला तरी, त्यांची पदे रिक्त करतील ;

(ख) या अधिनियमाच्या तरतुदींखालील आदेशाद्वारे जे अधिकार व कर्तव्ये परिषदेकडून किंवा तिच्या वतीने वापरता येतील किंवा कर्तव्ये पार पाडता येतील असे अधिकार व कर्तव्ये निष्प्रभावाच्या कालावधीमध्ये, राज्य शासन निदेश देईल अशा व्यक्तीकडून किंवा व्यक्तींकडून वापरण्यात येतील आणि पार पाडण्यात येतील ;

(ग) परिषदेकडे निहित असलेली सर्व मालमत्ता निष्प्रभावाच्या कालावधीमध्ये राज्य शासनाकडे निहित होईल.

(३) पोट-कलम (१) अन्वये काढलेल्या अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेला निष्प्रभावाचा कालावधी समाप्त झाल्यावर, राज्य शासनास,—

(क) त्यास आवश्यक वाटेल अशा कालावधीसाठी निष्प्रभावाचा कालावधी आणखी वाढविता येईल. मात्र, असा कालावधी एकूण दोन वर्षांपेक्षा अधिक असणार नाही ;

(ख) तरतूद केलेल्या रीतीने नवीन परिषद घटित करण्यासाठी उपाययोजना करता येतील.

अडचणी दूर करणे. **४१.** (१) या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुरूप, आदेशाद्वारे, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठी त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसेल अशी कोणतीही गोष्ट करता येईल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांपुढे मांडण्यात येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई